divyamarathi.com

# सुपरफास्ट गाड्यांना थांबा द्या !

## आम आदमी पार्टीने रेल्वे प्रशासनास दिले स्मरणपत्र

प्रतिनिधी । चाळीसगाव



प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी चाळीसगाव रेल्वेस्थानकावर संचखंड, महानगरी आदी एक्सप्रेस गाड्यांना थांबा द्यावा, या मागणीसाठी आम आदमी पार्टीतर्फे रेल्वे प्रबंधकांना स्मरणपत्र देण्यात आले आहे. दोन महिन्यांपूर्वी या मागणीचे निवेदन देण्यात आले होते. मात्र, दखल घेण्यात आली नाही.

चाळीसगाव शहर हे सन २०११ च्या जनगणनेनुसार जवळपास लाखभर लोकसंख्या असलेले शहर असून तालुक्यात १४३ खेडी आहेत. तालुक्यातील खेड्यांची लोकसंख्या जवळपास तीन ते साडे तीन लाखांच्या घरात असून धुळे, जळगाव, औरंगाबाद, नाशिक या महानगरांच्या केंद्रस्थानी चाळीसगाव रेल्वे स्टेशन आहे. जळगाव, धुळे, नाशिक येथे तालुक्यासह शहरातील अनेक नागरिक दररोज विविध कामांसाठी रेल्वेने ये जा करीत असतात. रेल्वेस्थानकावरील गर्दी पाहता त्या प्रमाणात गाड्यांची उपलब्धता नाही. तसेच अनेकदा प्रवासी मोठी गैरसोय होत असून अनेकदा वादही उद्भवले आहेत. प्रवास सुकर होण्यासाठी चाळीसगाव रेल्वेस्थानकावर अनेक एक्सप्रेस थांबवण्यात याव्यात या मागणीसाठी प्रवाशांच्या सह्यांचे २९ ऑगस्ट २०१६ रोजी वाणिज्य व्यवस्थापक व रेल्वे स्टेशन प्रबंधकांना आम आदमी पार्टीतर्फे निवदेन देण्यात आले होते. परंतु, या निवेदनाची कोणत्याही प्रकारची दखल न घेतल्याने आम आदमी पार्टीतर्फे स्मरणपत्र देण्यात आले असून प्रवाशांची होणारी गैरसोय टाळण्याची मागणी करण्यात आली आहे. निवेदनावर समन्वयक तुषार निकम, सुकदेव पाटील, अॅड. सुभाष खंडाळे, सचिन राणे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.